गौहरजान, जुलै महिना व मुंबई

[रहेगी याद मुझको, बम्बई वालों की मेहमानी]

जुलै २०१०. गेल्या शतकातल्या एका मशहूर तवायफच्या, 'कलकत्तेवाली गौहरजान'च्या आठवणी जागविणारा महिना. 'माय नेम इज गौहरजान' हया सध्या गाजत असलेल्या नव्या को-या इंग्रजी पुस्तकाच्या निमित्तानं मुंबईत या महिन्यात दोन श्रवणसत्रं झाली. एक अंधेरीच्या 'भवन्स कल्चरल सेंटर' मध्ये व दुसरं दक्षिण मुंबईतल्या लब्धप्रतिष्ठांची वर्दळ असलेल्या 'एन. सी. पी. ए.'च्या संकुलात. याला ज्येष्ठ नागरिकांनी, हया पिढीच्या संगीतकारांनी व संगीतप्रेमींनी मोठया संख्येनं हजर राहून मनापासून दाद दिली. एक 'कोठेवाली', केवळ आपल्या ध्वनिमुद्रित गाण्यानं सर्वांनाच कशी वश करून घेते याचं आश्चर्य वाटत होतं. खरखरणारी पण अदभुत ध्वनिमुद्रणं ऐकत असताना माझं मन मात्र शंभरएक वर्ष मागं गेलं.

जुलै १९०७. गौहरजानचा ग्रामोफोन रेकॉर्डसच्या माध्यमातून हिंदुस्थानभर बोलबाला होत असताना १९०५ ते १९०८ या काळात तिचा मुंबईतला मुक्काम लक्षणीय होता. त्याचं मुख्य कारण म्हणजे तिचा प्रियकर अमृत केशव नायक व तिचा घोडयांच्या रेसचा अतिरेकी नाद. सीझनमध्ये दिवसा ती महालक्ष्मी रेसकोर्सवर असे व रात्री 'आम' आदमीच्या मनोरंजनासाठी बोरीबंदर समोरच्या आजच्या ओसाड 'कॅपिटॉल' सिनेमात सर्वसामान्य रसिकांना परवडेल अशा दराची तिकिटं लावून जलसे करत असे. हया 'आम' आदमीच्या ठिकाणापासून जवळच असलेल्या 'खास' लोकांच्या

टाऊन हॉल (एशियाटिक लायब्ररी) मध्ये तिला जुलै १९०७ मध्ये खास निमंत्रण आलं. तिथं तिचा जलसा झाला. उपस्थितांमध्ये फिरोजशाह मेहता, सेठ गोकुळदास, सेठ रतनशी अशी प्रतिष्ठित व बडी मंडळी होती. त्या प्रसंगी मुंबई शहराची भलावण करणारी एक नज़म म्हणजे कविता तिनं पेश केली. त्यात हया शेठांची नावं मोठया खुबीनं गुंफलेली होती. इतकंच नव्हे तर हया मंडळींना बरं वाटावं म्हणून त्यात चक्क किंग एडवर्डला 'कयामत' तक आयुष्य लाभावं अशी दुवा पण मागितली. पुढं ग्रामोफोन कंपनीनं हयाचीच एक ध्वनिमुद्रिका बनवली व विशेष लेबलवर वितरित केली. लेबलवर टाऊन हॉलचा उल्लेख आहे. गाण्याच्या अगदी शेवटी आपलं नाव सांगितल्यावर तिनं फिरोजशाह मेहतांचं पण नाव घेतलंय. अलिकडेच हया अत्यंत दुर्मिळ ध्वनिमुद्रिकेची प्रत मिळाली आहे. रेकॉर्ड नं. पी. ३६५. 'धुन कल्याण कव्वाली'. आठ कडव्यांचं हे गाणं ऐकणं हा एक दुर्मिळ अनुभव आहे. मुंबई शहराचं खास स्थान हया गाण्यातून अधोरेखित झालंय. हया जलशानंतर काही दिवसांनीच अमृत केशव नायक अचानक मरण पावले. गुजराथी रंगभूमीचे ते मोठे कलाकार होते. आज त्यांच्या नावाचा रस्ता 'पी. एम. रोड' म्हणजेच फिरोजशाह मेहता रोडवरील खादी भांडाराच्या मागच्या गल्लीत आहे. 'टाऊन हॉल' दोनशे वर्षांच्या पुढची वाटचाल दिमाखानं करतो आहे. तर 'कॅपिटॉल' सिनेमाची देखणी दगडी इमारत गर्दुल्यांनी वेढली असून उद्धाराची वाट पहात दीनवाणी उभी आहे.

डॉ. सुरेश चांदवणकर, नेव्हीनगर, कुलाबा, मुंबई. २५ जुलै २०१०
chandvankar.suresh@gmail.com cell - 9920813336

धुन कल्याण कव्वाली (रेकॉर्ड नं. पी.३६५)

चलो गुलजार आलम मे हवाये फ़ज़ल रहमानी
फला फूला खड़ा हर काम इसे रखना नाखल़ बोस्तानी...१

हैं तो यह जहाँमे अब हाथ गर दस्तयों भी मन
ग़र्ज़ हिंन्दू मुसलमां सब के सब है ख़न्दा पेशानी...२

जहिइये मजलिस हूं जिन के सद्र सरभी दोर का ऐसा
वह बर्क़ अंदाज गोकुल दास जी इक़बाल हों बानी...३

रहे आबाद या रब बम्बई तू और बम्बई वाले
कहाँ मैं एक मुसाफिर और कहाँ यह कद्र सुलतानी...४

मुझे इज्ज़त जो बक्षी और जो है कद्र की मेरी
रहेगी याद मुझको बम्बई वालों की मेहमानी...५

जहाँ के स्कूल के मालिक रतनसी सेठ जी साहब
करें बच्चोंकी ख़िदमत और करे उन की निग़हबानी...६

खुदाया शाह एडवर्ड को तू रख जिंदा कयामत तक
रहे कायम हुकूमत और होवे फ़ज़ले रब्बानी...७

दुआ पर सर झुका कर ख़तम करता हूँ कलाम अपना
रहें सब महरबान उन पर हो सब पर फ़ज़ल एवहानी . . .८

माय नेम इज गोहरजान .
यह गाना कम्मालका है
फिरोजशाह मेहताकी तारीफमे

Miss Goher-Jan.